# अधिसूचना

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६, पुणे
यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, अ – विंग,
तळमजला पुणे- ४११००१
पुणे. दिनांक :- 29/12/2020

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) कलम १९ (१) नुसार अधिसूचना**

क्रमांक उपजि. ०६ / भूसं/ एस.आर/ १० /२०१९ ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, पुणे यांनी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३०) ( यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे. ) यांच्या कलम ११ च्या पोट पोट कलम (१) व्दारे प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक उपजि- ०६ / भूसं/ एसआर – १० / २०१९पुणे दिनांक ४ जानेवारी, २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे, आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीएक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची, अनुसूचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिवी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६, पुणेयांचे कार्यालयाकडे कलम ११ च्या पोट कलम (१) अन्वये प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द झालेचे दिनांकापासून ६० दिवसांचे आंत कलम १५ (१) (अ) व (ब) बाबत कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या हरकती प्राप्त झालेल्या नाहीत; तसेच कलम १५ (१) (क) बाबत भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापिना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम 2018 चे कलम १० (क) नुसार सदर प्रकल्पास महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचना क्र. संकिर्ण-२०१९ / प्र.क्र. ३/ अ-३ दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्रकरण २ व ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम १ च्या तरतूदींन्वये, या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसूची दोनमध्ये नमूद उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये वर्णन केलेप्रमाणे उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत म्हणून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केलेला नाही.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ६, पुणे पत्ता- जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, "अ" विंग, तळमजला, पुणे – ४११००१ यांस पद निर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक
संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन
**गावाचे नाव- संगमवाडी ता. पुणे शहर जि. पुणे**

| अ.क्र. | सिटीएस नं / फा. प्लॉ. नं | मोजणीनुसार संपादन क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | फा. प्लॉ. नं ९४ | एन्ट्री / एक्झिट- 1 क्षेत्र ३५७.४७ चौ.मी. | फा. प्लॉ. नं ९४ | फा. प्लॉ. नं. ९४ | रस्ता | फा. प्लॉ. नं ९४ |
| | | एन्ट्री/ एक्झिट- २ क्षेत्र ३५७.१५ चौ.मी. | | | | |
| | | फुटपाथ पैकी क्षेत्र १८.४३ चौ.मी. | | | | |
| | **एकूण** | **७३३.०५ चौ.मी.** | | | | |

## अनुसूची- दोन
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : पुणे मेट्रो रेल प्रकल्प, (वनाज ते रामवाडी) मार्गिका क्र. २ मधील मंगळवार पेठ मेट्रो स्टेशन एन्ट्री / एक्झिट- १ व २, स्टेअरकेस, एक्सेलेटर व लिफ्ट बांधकामासाठी

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : विशेष सार्वजनिक वाहतूकीचा पायाभूत सुविधा प्रकल्प

**समाजाला होणारे लाभ** : पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे वनाज ते रामवाडी या मार्गिके वरील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलद गतीने होण्यास मदत होणारआहे.

## अनुसूची- तीन
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**
**गावाचे नाव- संगमवाडी ता. पुणे शहर जि. पुणे**

| अनुक्रमांक | सिटीएस नं / फा. प्लॉ. नं. | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाही, सबब पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक आहे. | | |

## अनुसूची – चार
**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

| |
|---|
| पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश वर्णन निरंक असे. |

**टिप:-** उक्त जमीनीच्या नकाशाचे निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६, पुणे या कार्यालयाचा पत्ता – जिल्हाधिकारी कार्यालय इमारत "अ" विंग तळ मजला पुणे – ४११००१ येथे करता येईल.

दिनांक:29 /12/2020
ठिकाण: पुणे

जिल्हाधिकारी पुणे

( डॉ. राजेश देशमुख )
जिल्हाधिकारी, पुणे